महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.५६९/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ५४४ दिनांक १९ / ०९ / २०१६

**विषय :** म.रा.वि.वि.कं.मर्या. मधील कर्मचाऱ्यांना दि.०१ सप्टेंबर २०१६ पासून सुधारित दराने महागाई भत्ता देण्याबाबत.

**वाचा :** १) प्रशासकीय परिपत्रक क्र.५३० दि.१६.०२.२०१६
२) शासन निर्णय क्र.मभवा-२०१६/प्र.क्र.४४/सेवा-९ दि. ०१.०९.२०१६

........

महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या आधारे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित मधील कर्मचाऱ्यांसाठी सुधारित दराने महागाई भत्ता मंजूर केला जातो.

२. आता वित्त विभाग, शासन निर्णय क्र.मभवा-२०१६/प्र.क्र.४४/सेवा-९ दि.०१.०९.२०१६ अन्वये महाराष्ट्र शासनाने, शासनाच्या सर्व पात्र पूर्णकालीक कर्मचाऱ्यांना ०१ सप्टेंबर २०१६ पासून सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतनावरील (वेतन बँड मधील वेतन अधिक ग्रेड वेतन) अनुज्ञेय असलेला महागाई भत्त्याचा दर ११९% वरून १२५% केला आहे. तसेच दि.०१ सप्टेंबर २०१६ पासून सदर महागाई भत्त्याची रक्कम अदा करण्यात यावी व दिनांक ०१ जानेवारी २०१६ ते ३१ ऑगस्ट २०१६ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीच्या आहरणाबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील असेही आदेश पारीत केलेले आहेत.

३. आता शासनाच्या धर्तीवर म.रा.वि.वि.कं.मर्यादित मधील सर्व कर्मचाऱ्यांना त्यांचे मूळ वेतनावर **११९%** ऐवजी **१२५%** अशा सुधारित दराने दि.०१ सप्टेंबर २०१६ पासून महागाई भत्ता देण्याबाबत मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन) व संचालक (प्रकल्प) यांच्याशी विचार विनिमय करुन मंजुरी प्रदान केली आहे. तसेच सुधारित दरानुसार महागाई भत्त्याची रक्कम महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना माहे **सप्टेंबर २०१६** पासूनच्या वेतनामध्ये समाविष्ट करून देण्यात यावी.

४. उपरोक्त सुधारित दराने द्यावयाच्या दिनांक ०१ जानेवारी २०१६ ते ३१ ऑगस्ट २०१६ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम अदा करण्याबाबत शासन निर्णयानुसार स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक महावितरण कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

( संदेश हाके )
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

D:\O&M\D.A-Adm.Circular